# होळ येथे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव

## जंगी मिरवणूक काढून नागरी सत्कार; माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे यांची विशेष उपस्थिती

**केज । किसान न्युज**

दि.१८ : तालुक्यातील होळचे सुपुत्र, राज्याच्या व्हीआयपी सुरक्षा विभागाचे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सेवापूर्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन रविवारी (दि.१७) सकाळी ११ वाजता होळ येथील हनुमान मंदिरात करण्यात आले. या सोहळ्यापूर्वी ग्रामस्थांनी जंगी मिरवणूक काढून त्यांचे उस्फूर्त स्वागत केले. कार्यक्रमाला राजस्थानचे माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे विशेष अतिथी म्हणून




उपस्थित होते. सोहळ्याचे अध्यक्षस्थान सरपंच अश्विनीताई शिंदे यांनी भूषविले. प्रमुख अतिथींमध्ये मांजरा कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक दत्ता शिंदे, माजी सरकारी वकील ॲड.प्रकाश शिंदे, पुणे सीआयडीचे माजी पोलीस उपअधीक्षक दीपक शिंदे, केंद्रप्रमुख रमेश कांबळे, माजी प्राचार्य डॉ.ज्ञानोबा सरवदे, बारामती ॲग्रोचे प्रबंधक अंकुश ढवारे, मुख्याध्यापक धर्मराज शिंदे, हृदयरोगतज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.गणेश ढवारे यांचा समावेश होता. यावेळी मान्यवरांचा होळ ग्रामस्थांच्यावतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या पुढाकाराने पार पडलेल्या या सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने हजेरी लावली. होळ गावातील दोन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा झालेला हा गौरव सोहळा ग्रामस्थांसाठी अभिमानाचा क्षण ठरला. यावेळी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरही उपस्थित होते.

# लग्न लावून फसवणाऱ्या टोळीला वडवणी पोलिसांनी ठोकल्या बेड्या

## लग्नाच्या बदल्यात घेतले होते पावणे दोन लाख रुपये

**वडवणी । किसान न्युज**

वडवणी येथील रहिवासी ज्ञानेश्वर रोमन यांचे लग्न गेल्या काही दिवसांपासून होत नव्हते. उपळी येथील मध्यस्थी व्यक्तीने ज्ञानेश्वर यांचे लग्न जालना जिल्ह्यातील मुलीशी जमवून दिले या बदल्यात मुलीच्या नातेवाईकांनी ज्ञानेश्वर यांच्याकडे दोन लाख रुपयांची मागणी केली होती तडजोडी अंती एक लाख ७० हजार रुपये मुलाने दिले.मोजक्याच पाहुण्यांमध्ये ज्ञानेश्वर यांचे राधा नावाच्या मुलीशी लग्नही झाले.मुलीच्या आईने मुलीला फोन करून तुला माहेरी नेण्यासाठी येत आहोत असा फोन केला त्याप्रमाणे मुलीला वडवणी येथे घेण्यासाठी सोमेश वाघमारे प्रियांका बाफना हे आले. मुलाकडील नातेवाईकांनी मुलीची आई मुलीला नेण्यासाठी का आली नाही असे विचारणा केली असता सोमेश व प्रियांका



यांनी आम्हीच नेणार आहोत मुलीच्या आईने आम्हालाच नवरी राधाला घेण्यासाठी पाठवले आहे असे सांगितले त्यामुळे मुलाकडील नातेवाईकांना हा फसवणुकीचा प्रकार असल्याचे लक्षात आले. ज्ञानेश्वर व नातेवाईकांनी नवरी राधा आणि तिला घेण्यासाठी आलेले सोमेश आणि प्रियंका यांना घेऊन वडवणी पोलीस ठाण्यात आले असता वडवणी पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांनी चौकशी केली असता ही लग्नाच्या नावाखाली फसवणूक करणारी टोळी असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. मुलाच्या फिर्यादीवरून नऊ आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे याचा पुढील तपास वडवणी पोलीस हे करत आहेत.

# चोरीचे वाहन पकडून वाहतुक शाखेचा वाहनचोरीला लगाम



**बीड । किसान न्युज**

बीड जिल्हा वाहतुक शाखेने पोलीस अधिक्षक नवनीत कांवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष सानप व पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी व त्यांच्या टीमने गेल्या महिनाभरात जिल्हाभरात बीड, परळी, गेवराई, नेकनूर येथे अवैध वाहतुक करणार्यांवर चांगलाच दणका दिला होता तसेच बीड नगर परिषदेला देखील संयुक्त कार्यवाहीमध्ये सहकार्य करुन शहरातील अवैध अतिक्रमण हटवले होते ज्यामुळे रस्त्यांना मोकळा श्वास घेता आला असे असतांनाच आज दि.१९ मंगळवार रोजी सुभाष रोडवरील जिल्हा वाहतुक शाखेच्या कार्यालयासमोर ४ वाजण्याच्या सुमारास मोटार वाहन केसेस चालू असतांना मोटार सायकल चालक पकडला गेला व तो विचारपुस करण्याच्या दरम्यान ततऽऽ पपऽऽ ची भाषा बोलत उत्तरे देणं टाळू लागला यावेळी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या व सहकार्यांच्या हा प्रकार चोरीचा असल्याचे लक्षात येताच सदरील वाहनधारकास शिताफीने पकडून त्यांनी वाहन ताब्यात घेतले. याबाबत विस्तृत माहिती अशी की, दि.१९ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर व सहकारी पो.ह.विष्णु काकडे, पोलीस अंमलदार वसीम शेख, चिंतामण शिंदे, चालक संतोष हरके, नारायण वाघमारे, पोलीस हवालदार राजाभाऊ तांदळे यांनी सुभाष रोडवरील वाहतुक शाखेच्या कार्यालयासमोर कार्यवाही चालू असतांना मोटारसायकल चालक नामे प्रशांत मंगेश देवतवाल (२० वर्षे) रा.विरशैव कॉलनी, पेठ बीड ता.जि.बीड हा होंडा कंपनीचे वाहन क्रमांक एम.एच.२२ ई ७०७६ चालवत असतांना त्यास दंडात्मक कार्यवाहीसाठी ताब्यात घेतले व चौकशी करत असतांना तो उडवा-उडवीची उत्तरे देवू लागला सदर प्रकार हा पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या लक्षात येताच त्यांनी डिव्हाईसवर सदरील वाहनासंबंधी माहिती पाहिली असता सदर वाहन २०२२ मध्ये परभणी जिल्हा नांनलपेठ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.०२२९/२२ कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे आढळून आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी व त्यांच्या सहकार्यांनी वाहनचालक व वाहन पुढील कार्यवाहीस्तव पोलीस स्टेशन बीड शहर येथे जमा केले.

## पू.नारायणदादा काळदाते स्मृती सन्मती पुरस्कार-२०२५

# ‘ह.भ.प.गुरूवर्य संदीपान महाराज शिंदे हासेगावकर’ यांना जाहीर

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ.विजय फुलारी यांच्या शुभहस्ते प्रदान होणार

**बीड । किसान न्युज**

दि. ८ सप्टेंबर रोजी अंबाजोगाई येथे वितरण पू.नाराणदादा काळदाते स्मृती प्रतिष्ठान, अंबाजोगाई च्या वतीने शैक्षणिक अथवा सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एका व्यक्तीस अथवा संस्थेस अथवा समाजोपयोगी उपक्रमास पु.नारायणदादा काळदाते स्मृती सन्मती पुरस्काराने गौरविले जाते. या वर्षीचा पंधरावा पुरस्कार 'ह.भ.प.गुरूवर्य श्री.संदीपान महाराज शिंदे हासेगावकर' यांना देण्यात येणार आहे. या पुरस्काराचे वितरण डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ.विजय फुलारी यांच्या शुभहस्ते दि. ०८ सप्टेंबर २०२५ (सोमवार) रोजी दु.०३:०० वा. ड.भगवानदासजी लोहिया कल्याण मंडपम, मानवलोक अंबाजोगाई येथे होणार आहे. स्व.नारायण दादा काळदाते हे वारकरी संप्रदायातील होते. त्यामुळे या वर्षीचा हा पुरस्कार 'ह.भ.प.गुरूवर्य श्री.संदीपान महाराज शिंदे हासेगावकर' यांना सामाजिक, आध्यात्मिक व वारकरी सांप्रदायीक उत्कृष्ठ कार्याबद्दल देण्यात येत आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र , स्मृती चिन्ह, शॉल, पुष्पगुच्छ, फेटा व २१,०००/- रू. धनादेश असे असणार आहे. 'ह.भ.प.गुरूवर्य श्री.संदीपान महाराज शिंदे हासेगावकर' हे जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आहेत. या संस्थेमार्फत ते वारकरी व कीर्तनकारांना मार्गदर्शन करतात. त्यामुळे वारकरी संप्रदायाची परंपरा पुढे चालू ठेवण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी आयुष्यभर वारकरी संप्रदायातील तत्त्वांना अनुसरून संप्रदायाची सेवा केली आहे. या कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार व वारकरी संप्रदायाचे अभ्यासक मा. शामसुंदर सोन्नर महाराज प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यापुर्वी मराठवाड्याच्या शैक्षणिक क्षेत्रात कार्यकर्तुत्व गाजवणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यामध्ये प्राचार्य प्रतापराव बोराडे सर, श्री.गोपाळराव पाटील, श्री.सिद्रामप्पा नागाप्पा आलुरे गुरुजी, श्री.मोहनराव सोळुंके, डॉ.नागनाथ कोतापल्ले, श्री.द.रा.कुलकर्णी, डॉ.बी.आय.खडकभावी, मा.श्री.संदीप पवार, महत्मा ज्योतीबा फुले वसतिगृह, अंबाजोगाई डॉ.सुरेश खुरसाळे, मा.श्री.प्रविणकुमार श्रीराम काळमपाटील, राष्ट्रसेवा दल संचलित आपल घर, प्राचार्य डॉ.भागवत जनार्धन कटारे, माजी आरोग्य मंत्री श्री. राजेश टोपे, मा.डॉ.तसनिम पटेल यांचा समावेश आहे. तरी या कार्यक्रमास आपण उपस्थित रहावे असे अवाहन पु.नारायणदादा काळदाते स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री.जी.जी.रांदड, उपाध्यक्ष श्री.एस.के.जोगदंड व सचिव डॉ.नरेंद्र काळे, सहसचिव डॉ.नवनाथ घुगे, श्री.अनिकेत लोहिया, श्री.प्रताप पवार, श्री.विश्वास नरवाडे, श्री.अंगदराव तट, ड.चव्हाण जयसिंग, श्री.एस.बी.सय्यद, उध्दवराव आपेगावकर, श्रीमती रजनी काळदाते यासह सर्व सदस्यांनी केले आहे.





# सततच्या पावसामुळे नेकनूर येथील नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्या

## नेकनूर चे सरपंचपती सुंदर लांडगेसह सदस्यांकडून तहसीलदार यांना निवेदन



**नेकनूर । किसान न्युज**

नेकनूर मंडळासह परिसरातील भागात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी,अशी मागणी नेकनूर चे सरपंच पती सुंदर लांडगे यांनी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली आहे. या वेळी ग्रामपंचायत सदस्य सय्यद साजेद अली(बाबू भाई) , शिवाजी शिंदे, चक्रधर शिंदे, इजारारोद्दीन जहागीरदार, अशोक शिंदे पत्रकार,लालू जहागीरदार, पत्रकार खालेद भाई हे उपस्थित होते. सततच्या पावसामुळे शेतामधील कांदा पिक अक्षरशः नेस्तनाबूत झाले आहे.सोयाबीन,कापूस,मुग, उडीद या पिकासह अन्य पिकांना सुध्दा हानी पोहोचली आहे.काही शेतकऱ्यांचे मुग व उडीद पीक हाती येऊन गेले अशी परिस्थिती झाली आहे. सततच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेती पिकाचे नुकसान झाले आहे,तसेच फळबागांना देखील या पावसामुळे मोठ्या प्रमाणात फटका बसलेला आहे.सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या संपूर्ण शेतकऱ्यांचे पिकांचे पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी नेकनूर चे सरपंच पती सुंदर लांडगे यांनी केली आहे.

# श्री. एकविरा प्रतिष्ठाणच्या कार्याध्यक्ष पदी मुकुंदपाटील यांची निवड

**बीड । किसान न्युज**

श्री. एकविरा प्रतिष्ठानची सर्वसाधारण सभा दिनांक १५.०८.२०२५ रोजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. डॉ. तुषार श्रृंगारपुरे यांच्या प्रल्हाद चेंबर्स सुभाष रोड येथील कार्यालयात सायंकाळी ६.०० वाजता संपन्न होवून यावर्षी गणेशोत्सव व नवरात्री महोत्सव घेण्याचे ठरले. कार्यक्रमाची सुरुवात एकविरा देवी व स्वातंत्रदेवी यांना पुष्पहार घालून करण्यात आली. यावेळी या प्रतिष्ठानची कार्यकारणी घोषीत करण्यात आली. अध्यक्ष - श्री. दत्तात्रय सुर्यभान धांडे, उपाध्यक्ष संतोष तुळशीदास जाधव, सचिव रविंद्र कुलकर्णी, कोषाध्यक्ष - सुधिर वडतर, व्यवस्थापक अविनाश कुलकर्णी सदस्य आख्तर पेटर, दिनानाथ कांबळे, अनिल रुईकर, महिला आघाडी - ॲड. मंदा गांदले (संकपाळे), रविंद्र थिगळे (इंजि.), किरण देशमुख (इंजि.) संदिप गुळजकर (शासकीय कंत्राटदार) आश्रयदाते मा. आ. प्राध्यापक सुनिल दादा धांडे ॲड. चंद्रकांत नवले, नवनाथ आण्णा शिराळे, योगेश कुलकर्णी, जितेंद्र बुंदेले, शेषेराव तांबे ही कार्यकारणी निवडण्यात आली. यावर्षी २७.०८.२०२५ रोजी ते ०८.०९.२०२५ पर्यंत गणेशोत्सव व पुढील महिन्यातील नवरात्र उत्सव साजरा करण्याचे ठरले. यावर्षीही प्रतिवर्षीप्रमाणे डबल विकेट क्रीकेट स्पर्धा महिला आणि पुरुष, स्व. मुकेश स्मृती विज्ञान स्पर्धा घेण्याचे ठरले. या स्पर्धा छत्रपती संभाजीमहाराज क्रिडांगण व ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालय येथे घेण्याचे ठरले याचवेळी या वर्षीचा एकविरा प्रतिष्ठानचा पुरस्कार घोषित करण्यात येणार असून त्यासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत.



**बीड - नगर परिषद चे नुतन मुख्याधिकारी कैलाश फड़से यांचा बीड शहर कॉंग्रेस कमेटी च्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी कॉंग्रेस बीड़ शहर अध्यक्ष परवेज कुरेशी कॉंग्रेस ओबीसी बीड शहर अध्यक्ष सय्यद फरहान कॉंग्रेस बीड शहर उपध्यक्ष काजी मुहीबूर्रहेमान रईज़ भाई.फेरोज भाई.माजेद खादरी व ईतर जन उपस्थीत होते.**

# कन्या सन्मान दिवस पाचोडला साजरा, जिल्ह्यात ८४ ठिकाणी उपक्रम



**पाचोड । किसान न्युज**

कन्या सन्मान दिवस पाचोड येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला. छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील ८४ ठिकाणी हा उपक्रम राबवण्यात आला. पाचोड येथे झालेल्या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी स्वामी यांनी उपस्थिती लावली. ते म्हणाले, मुलगी नको ही मानसिकता बदलली पाहिजे. गावखेड्यात अजूनही मुलीच्या जन्माला विरोध केला जातो. गर्भलिंग तपासणी करून मुलगी असल्यास गर्भपात केला जातो. हे गंभीर आहे. असे करणाऱ्यांना तीन वर्षांची शिक्षा आणि दहा हजार रुपयांचा दंड होतो. तरीही अनेक पालक मुलीचा गर्भपात करत आहेत. स्वामी म्हणाले, मुलगा म्हणजे वंशाचा दिवा ही संकल्पना चुकीची आहे. अनेक मुले आईवडिलांना वृद्धाश्रमात टाकतात. मुली मात्र जन्मभर साथ देतात. प्रत्येक भावाला बहीण हवी असते. पण मुलगी नको ही मानसिकता अजूनही आहे. आई, बहीण, पत्नी हवी पण मुलगी नको, हे कसं चालणार, असा सवाल त्यांनी उपस्थितांना विचारला. बालविवाहाचे प्रमाणही वाढले आहे. मुलाचे वय २१ आणि मुलीचे १८ वर्षे असतानाही अल्पवयीन मुलींचे विवाह होत आहेत. हे थांबवण्यासाठी ग्रामपंचायतींनी शपथ घ्यावी. गावातील एकही महिला गर्भलिंग तपासणीसाठी सोनोग्राफी सेंटरवर जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. कौटुंबिक अत्याचार होणार नाही, याचीही शपथ घ्यावी.

# ऑल इंडिया पँथर सेना निवडणुकीसाठी सज्ज

## सातारा- बैठकीत रणनीती ठरली - राज्य प्रदेश प्रवक्ते- नितीन सोनवणे



**बीड । किसान न्युज**

ऑल इंडिया पँथर सेनेच्या महाराष्ट्र कोर कमिटीच्या बैठकीत आगामी निवडणुकांसाठी रणनीती आखण्यात आली. सातार्यातील विश्रामगृह येथे पार पडलेल्या या बैठकीत निवडणूक तयारीवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी पुण्यात लवकरच राज्यव्यापी कार्यकर्त्यांची भव्य बैठक घेण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. ऑल इंडिया पँथर सेना आता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचली असून, सामाजिक आंदोलनातून उदयास आलेली ही संघटना राजकीय क्षेत्रात ठामपणे वाटचाल करत आहे. सर्वसामान्य, शोषित आणि वंचित घटकांचा आवाज म्हणून पँथर सेनेने स्वतःची ओळख निर्माण केली आहे. निवडणूक लढण्यासाठी इच्छुकांची मोठी संख्या पुढे येत असून, संघटना त्यांना रचनात्मक आणि संस्थात्मक दिशा देण्यास सज्ज असल्याचे नेत्यांनी स्पष्ट केले. या बैठकीला महाराष्ट्र अध्यक्ष विनोद भोळे, उपाध्यक्ष बाळासाहेब शेंडगे, सरचिटणीस जितेश भाई जगताप, प्रदेश प्रवक्ता व बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, विदर्भ अध्यक्ष दादाराव ढोले आणि कोऑर्डिनेटर अविनाश हिवाळे उपस्थित होते.

# नांदगाव खु.गावामध्ये शेतकऱ्यांना कृषि माहिती केंद्र व रानभाज्या प्रदर्शनाच्या माध्यमातून मार्गदर्शन!



**बीड । किसान न्युज**

महाड नगरीत शेतकऱ्यांना आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची माहिती व्हावी यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली संलग्न श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ संचलित कृषि महाविद्यालय मोहोप्रे-आचळोली येथील कृषिदूतांनी नांदगाव खु.गावात ग्रामीण कृषि जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषि माहिती केंद्र व रानभाज्या प्रदर्शन आयोजित केले होते. त्यामध्ये त्यांनी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली मधून विकसित झालेल्या विविध फळांच्या व जनावरांच्या जाती, भाताच्या जाती या सर्वांची माहिती त्याचबरोबर विविध अवजारे, बियाणे आणि रानभाज्या या सर्वांची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना दिली. त्याचबरोबर शेती संबंधित काही मॉडेल्स देखील तयार करून दाखवले. त्यामध्ये त्यांनी इंटिग्रेटेड फार्मिंग सिस्टीम, मुक्त गोठा असे काही मॉडेल्स तयार केले होते. या प्रदर्शनामध्ये त्यांनी शेती संबंधित सेंद्रिय व जैविक खतांची देखील ओळख करून दिली. या प्रदर्शनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाड तालुका तहसीलदार महेश शितोळे सर तसेच तालुका कृषी अधिकारी श्री. धीरज तोरणे उपस्थित होते. या प्रदर्शनासाठी नांदगाव खु. गावातील ग्रामस्थ व महिला यांचा मोलाचा प्रतिसाद मिळाला. कृषी महाविद्यालय मोहोप्रे-आचळोलीचे प्राचार्य डॉ. व्ही. जे. गिम्हवणेकर, कार्यक्रम समन्वयक प्रा. एस. एस. रायकर, कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एस. सावंत, यांच्या मार्गदर्शनाखाली हे कृषिदूत नांदगाव खु. गावामध्ये प्रात्यक्षिक राबवत आहेत. कृषि महाविद्यालय मोहोप्रे- आचळोली येथील कृषिदूतांमध्ये अथर्व बाबर, आदर्श कदम, सोमनाथ कोळेकर, वेदांत कुलकर्णी, आदित्य पवार, प्रशांत वळकुंदे, अभिजीत माने यांचा समावेश आहे.

# बीडचा फुटबॉलपटू मोमीन अब्दुल हक व अब्दुल हसीब चमकले - मद्रास एफसी निवड चाचणीसाठी निवड

## कोच आमेर खादरी, वो.अबूबकर चाऊस, रय्यान पटेल यांचे प्रत्नेला यश

**बीड । किसान न्युज**

शहराला अभिमानाचा क्षण लाभला आहे. मिलान बॉईज फुटबॉल क्लबचा उदयोन्मुख खेळाडू मोमीन अब्दुल हक याची भारतातील प्रख्यात संघांपैकी एक असलेल्या मद्रास एफसीच्या निवड चाचणीसाठी निवड झाली आहे. मद्रास एफसी हे भारतीय फुटबॉलमधील एक मानाचे नाव असून, मोमीन अब्दुल हकची ही कामगिरी केवळ त्याच्यासाठीच नव्हे तर बीडच्या फुटबॉल जगतातील सर्वांसाठी गौरवास्पद आहे. अब्दुल हकचा प्रवास हा मेहनत, समर्पण आणि फुटबॉलप्रती असलेल्या आवडीची कहाणी




आहे. एनआयएस प्रमाणित फुटबॉल प्रशिक्षक श्री. एस.पी. खान यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतलेला अब्दुल हक, मिलान बॉईज ज्युनिअर संघासाठी सातत्याने उत्तम खेळ करत आला आहे. अलीकडेच त्याने मुंबई येथे व्यावसायिक क्लबविरुद्ध सामने खेळून आपल्या कौशल्याची झलक दाखवली असून, तो बीड शहरातील फुटबॉलमधील एक नवोदित तारा ठरत आहे. स्पेशल थँक्स बीड डिस्ट्रिक्ट फुटबॉल एसोसिएशन बीड सपोट बाय मद्रास एफ सी ट्राईल.

# शेतकऱ्यांचे सरसकट तात्काळ पंचनामे करून भरपई द्या : अशोक डक

**माजलगाव । किसान न्युज**

गेल्या तीन-चार दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या अतिवृष्टीमुळे केवळ शेतीच नव्हे तर रस्ते, नदी-नाल्यालगतची जमीनही मोठ्या प्रमाणावर वाहून गेली आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांनी शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी अशी मागणी केली आहे. १३ ऑगस्टपासून सलग पडणाऱ्या पावसामुळे तालुक्यासह जिल्ह्यातील १७ महसुलमंडळात अतिवृष्टी झाली. परिणामी शेतकऱ्यांच्या हातात आलेले सोयाबीन, कापूस, तूर, बाजरी ही पिके पाण्याखाली गेली असून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. नदी-नाल्यालगत असणाऱ्या शेतजमिनी खरडून गेल्या आहेत. याशिवाय गावांना शहराशी जोडणारे रस्ते तसेच शेतात जाणारे पायवाटेचे रस्ते वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे हाल झाले आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने या रस्त्यांची दुरुस्ती करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, तसेच अतिवृष्टीग्रस्त सर्व शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी अशी मागणी अशोक डक यांनी केली आहे.



# रमाई घरकुल योजनेत बेकायदेशीर अडथळे

## लाभार्थ्यांकडून खरेदीखत व पी.आर. कार्डची सक्ती; मुख्याधिकारींवर तात्काळ कारवाईची मागणी

**बीड । किसान न्युज**

बीड नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या रमाई घरकुल आवास योजनेत लाभार्थ्यांना हक्काचा लाभ मिळण्यात गंभीर अडथळे निर्माण होत असल्याचे उघड झाले आहे. शासनाने मंजूर केलेला निधी नगरपरिषदेकडे उपलब्ध असूनही लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट वर्ग न करता मुख्याधिकारींकडून बेकायदेशीर अटी लादल्या जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्राप्त माहितीनुसार, मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी लाभार्थ्यांकडून खरेदीखत व पी.आर. कार्ड सादर करण्याची सक्ती केली असून शासन निर्णयात अशा अटींचा कोणताही उल्लेख नसतानाही त्यांची जबरदस्ती केली जात आहे. या प्रकारामुळे अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना योजनेंतर्गत निधी मिळण्यात प्रचंड विलंब होत आहे. याशिवाय, मुख्याधिकारी सौ. नीता अंधारे यांनी शासकीय संचिका आपल्या निवासस्थानी ठेवून शासन कामकाजात अडथळा निर्माण केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. ही संपूर्ण बाब जातीय मानसिकतेतून प्रेरित असून, दुर्बल व वंचित घटकांना योजनेंतर्गत निवारा नाकारण्याचा प्रयत्न आहे. लाभार्थ्यांकडून थेट रोख रकमेची मागणी होत असल्याच्या तक्रारी देखील प्राप्त झालेल्या आहेत. या अमान्य व बेकायदेशीर प्रकारामुळे लाभार्थ्यांमध्ये प्रचंड संतापाची लाट असून शासनाने तात्काळ कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे: मुख्याधिकारी सौ. नीता अंधारे यांनी शासकीय संचिका



निवासस्थानी नेल्याबाबत चौकशी करून शिस्तभंगाची कारवाई करावी, मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी लाभार्थ्यांकडून बेकायदेशीर अटी लादल्याबद्दल व निधी वितरणात अडथळे आणल्याबद्दल त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना योजनेंतर्गत लाभ नाकारल्याबाबत सदर प्रकरण ट्रॉसिटी क्ट अंतर्गत नोंदवून कठोर दंडात्मक कारवाई करावी, रमाई घरकुल योजनेतील प्रलंबित प्रस्ताव तातडीने मंजूर करून निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावा. यावेळी जिल्हाध्यक्ष अजय सरवदे बाबुराव मस्के, खंडू नाना जाधव, ज्ञानेश्वर कवठेकर, किरण वाघमारे, जंजाळ सर, लखन जोगदंड,मिलिंद सरपते, प्रकाश उजगरे, आदी उपस्थित होते.